# महाराष्ट्र विधानसभा
## चौथे अधिवेशन, २०१४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१४ / आग्रहनय २०, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **अल्पसंख्यांक विकास मंत्री** | |
| **(२)** | **कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **महसूल मंत्री** | |
| **(४)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **खनिकर्म मंत्री** | |
| **(६)** | **संसदीय कार्य मंत्री** | |
| **(७)** | **उद्योग मंत्री** | |

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

### सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतक-यांच्या भातपिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(१) * २३३८ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिनांक 24 ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतक-यांच्या भातपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील सुमारे ६० लाखांचे नुकसान झाले असून नुकसानीबाबत अद्यापही प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसानभरपाई तात्काळ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, भातपिकाचे नुकसान होऊन 13-15 दिवसांचा कालावधी उलटूनही अद्याप नुकसान भरपाई देण्यात न आल्यामुळे शेतक-यांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(६) असल्यास,चौकशीअती नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) हे खरे नाही. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी पंचनामे करुन अतिम अहवाल सादर करण्याबाबत संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत.

(३) होय.
(४), (५) व (६) कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिनांक २४ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे ज्या क्षेत्रावरील शेतीपिके व फळपिकांचे नुकसान झालेले आहे. त्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरु असून अतिम अहवाल प्राप्त होताच बाधित क्षेत्रास मदत देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा परिषद समाज कल्याण विभागा अतंर्गत लाभार्थ्यांकरीता वाटप करण्यात आलेल्या बैलगाडया निकृष्ट दर्जाच्या असल्याबाबत**

**(२) * ११८१ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) चंद्रपूर जिल्हा परिषद समाज कल्याण विभागा अतंर्गत सन 2013-2014 या वर्षात अल्पभूधारक/अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती लाभार्थ्यांकरीता वाटप करण्यात आलेल्या बैलगाडया हया निकृष्ट दर्जाच्या असल्याचे दिनांक 1 सप्टेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2)असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, संबंधित पुरवठा करणाऱ्या कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
या सर्व बैलगाड्यांच्या पुरवठा महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत गुणवत्ता तपासणी करुनच करण्यात आलेला आहे.
(२) उक्त प्रकरणी स्थानिक स्तरावर बैलगाडीचे मोजमाप केले असता, बैलगाडी तपासणी अहवाल निकषाच्या आत असल्याचे दिसून आले.
(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीची जमीन परत घेण्याबाबत**

**(३) * १८४० श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनी खाजगी व्यक्तिंनी निर्धारीत किंमतीपेक्षा कमी किंमतीने बळकावल्याबाबतची बाब राज्यातील अल्पसंख्यांक विकासाच्या सेवाभावी संस्था व त्यांच्या पदाधिका-यांनी मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा. राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधानमंत्री (अल्पसंख्यांक विकास) तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधित अल्पसंख्यांक विकास आयोग) च्या निदर्शनास माहे नोव्हेंबर, २०१४ वा त्या समारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय आणि चौकशीत काय निष्पन्न झाले,

(3) असल्यास, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषीतांवर कोणती प्रशासकिय वा दंडात्मक कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(4) असल्यास, सदरहू वक्फ बोर्डाच्या जमीन परत घेण्याकरिता शासनाने कोणती कारवाई केली करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) नाही.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लुल्ले ता मलेगांव (नाशिक) येथे गावक-यांच्या मालकीची जमीन भ्रष्टाचार करुन गिळंकृत केल्याबाबत**

**(४) * १६९६ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) लुल्ले (ता.मालेगांव ) येथील स.नं.172 व 242 गटातील गावकऱ्यांची सुमारे 1200 एकर जमीन काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी स्वत:चे नाव लावले असून सदर प्रकारास स्थगिती देवून सदर जमीन शेतक-यांच्या नावे अथवा सरकार जमा व्हावी म्हणून याबाबतचे निवेदन मालेगांव बाह्याचे लोकप्रतिनिधी यांनी मा.महसुल मंत्री यांना दिनांक 19 ऑक्टोबर, 2014 रोजी वा त्या सुमारास दिले आहे हे खरे आहे काय,
2)असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय
(3 ) असल्यास, यासंदर्भात सदर प्रकरणाला स्थगिती देण्याबाबत व लुल्ले येथील शेतक-यांच्या जमिनी त्याना मिळवून देण्याबाबत किंवा शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) नाही.
तथापि दि. 19 नोव्हेंबर, 2014 चे या विषयाशी संबंधित निवेदन प्राप्त झाले आहे.
(2) (3) व (4)
दि. 19 नोव्हेंबर, 2014 च्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी नाशिक यांना चौकशी करुन तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**मौजे माल्हेड (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील लाखो ब्रास दगडाचे उत्खनन करुन केवळ एक ब्रास दगडाची रॉयल्टी भरून शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडविल्याबाबत**

**(५) * ६३३ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यातील मौजे माल्हेड येथील गट नं.२०२ मध्ये बेकायदेशीरपणे खनिजपट्टा मंजूर करण्यात आला असून सदर दगड खाणीतून लाखो ब्रास दगडाचे उत्खनन करुन केवळ एक ब्रासची रॉयल्टी भरून शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडविल्याचे माहे ऑक्टोबर २०१४ वा त्या दरम्यानच्या कालावधीत निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीअती काय निर्दशनास आले व तदनुसार शासनाची लाखो रुपयाची रॉयल्टी बुडवणाऱ्या खाणकाम मालकावर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे माल्हेड येथील गट नं. २०२ मध्ये रितसर खनिपट्टा मंजूर केला आहे. खनिपट्टाधारकांने २००० ब्रास दगडाचे स्वामित्वधन शासनजमा करुन, २०६१ ब्रास दगड उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार खनिपट्टाधारकांस नोटीस देण्यात आली आहे.
४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इदांपूर (जि.पुणे) येथील दूधगंगा संघाचे व्यापारी संकुल बांधण्याच्या कामात पदाधिकारी व ठेकेदाराने बेकायदेशीरपणे गौण खनिजाचे उत्खनन करुन ते चोरुन विकल्याबाबत**

**(६) * २५०९ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) इदापूर (जि.पुणे) येथील दूधगंगा संघाचे व्यापारी संकुल बांधण्याच्या कामात दूधगंगाच्या पदाधिका-यांनी ठेकेदाराने तहसिल कार्यालयाची परवानगी न घेता तसेच रॉयल्टी न भरता गौण खनिजाचे उत्खनन करुन ते चोरुन विकले असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते यांनी महसूल विभागाच्या प्रधान सचिव यांच्याकडे केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, गौण खनिजांच्या अवैध विक्री प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीत दोषी आढळून येणा-या व्यक्तीवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.
(2) (3) व (4) इमारत बांधकामासाठी पाया खोदकामात मुरुमाचे उत्खनन करण्यात आले असून, त्याचा वापर सदर इमारतीचा पाया भरणी तसेच सदर ठिकाणच्या जमिनीचे सपाटीकरण करण्यासाठी केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
प्रथमदर्शनी संबंधितांनी गौण खनिज उत्खननासाठी पूर्वपरवानगी घेतल्याचे दिसून येत नाही. याबाबत अधिकची चौकशी करुन, अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**कल्याण ग्रामीण मधील सोनारपाडा व दावडी गावातील कुळांच्या जमिनीचे भुमाफीयांनी बनावट फेरफार केल्याबाबत**

**(७) * ५२२ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) कल्याण ग्रामीण मधील सोनारपाडा व दावडी गावातील कुळांच्या जमिनीचे 2012 मध्ये भुमाफीयांनी तलाठी व मंडळ अधिकारी यांना हाताशी धरुन बनावट फेरफार करुन हस्तांतरण केले होते, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील जमिनीचे केलेले हस्तांतरण शासनाने रद्द केले आहे काय,
(3) असल्यास, संबंधित भुमाफिया, तत्कालीन तलाठी व मंडळ अधिका-यांवर हस्तांतर केल्याप्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) अशी बाब दिसून येत नाही.
(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरे कॉलनी (मुंबई) येथे धान्य, वस्तू इ. च्या साठवणुकीकरीता गोदामे भाड्याने देण्यात आली असल्याने कोटयावधी रुपयांचे झलेले नुकसान

**(८) * ५५२** : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) आरे कॉलनी (मुंबई) येथील एकूण १७ गोदामे धान्य, वस्तू इ. च्या साठवणुकीकरीता १५ रुपये चौ.फूट इतक्या नाममात्र दराने भाड्याने देण्यात आली असताना सदरहू गोदामांमध्ये अंतर्गत सजावट करुन ते चित्रिकरणासाठी वापरुन त्याव्दारे कोटयावधी रुपयाचा आर्थिक फायदा मिळवित असल्यामुळे शासनाचे कोटयावधी रुपयांचे महसुली नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू गोदामांच्या करारची मुदत संपूनही तसेच त्यांना गोदाम खाली करण्याची नोटीस देवूनही अद्यापही गोदामे रिक्त करण्यात येवून शासनाच्या ताब्यात दिली गेली नाहीत हेही खरे आहे काय,
(3) सदरहू गोदाम भाडयाने देताना संबंधित कंपनी वा व्यक्तीसोबत करार करताना अधिकाऱ्यांना असलेल्या दूरदृष्टीचा अभाव व त्यांचा ढिसाळकारभार यांमुळेच आज शासनाचे कोटयावधी रूपयांचे महसूली नुकसान होत असल्याने सदरहू करार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात शासन कोणती कारवाई करणार आहे,
(4) तसेच मुदत संपुनही गोदामे शासनाच्या ताब्यात न देणाऱ्या संबंधित गोदाम चालकांविरुध्द वा कंपनी विरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे,
(5) तसेच यापुढे सदरहू गोदाम भाडेतत्वावर देण्याकरीता शासन काही नियमावली वा धोरण राबविणार आहे काय असल्यास त्याचा तपशील काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) हे खरे नाही.
(2) हे खरे नाही. गोदामांच्या कराराची मुदत संपलेली सर्व गोदामे रिक्त करुन शासनाच्या ताब्यात घेण्यात आली आहेत.
(3) व (4) प्रचलित शासन नियमातील तरतूदीनुसार गोदामांचे भाडे आधार मुल्ये ठरवून गोदामे भाड्याने देण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत. सर्वोच्च दर देणाऱ्या निविदा धारकास विहीत अटी व शर्तीच्या आधारे निविदेत नमूक केलेल्या कालावधीसाठी गोदामे भाड्याने देण्यात आली आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(5) प्रचलित शासन नियमातील तरतूदी व सदर प्रयोजनार्थ तयार करण्यात आलेल्या विहीत अटी व शर्तीच्या आधारे तसेच निविदा मागवून सर्वोच्च दर देणाऱ्या निविदाकारास निविदेत नमूद कालावधीकरीता गोदामे भाडेतत्वावर देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**वैजापूर, जि.औरंगाबाद या तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीर व नियमबाह्य पद्धतीने बेसुमार वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(९) * २०९४ श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) वैजापूर, जि.औरंगाबाद या तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीर व नियमबाह्य पद्धतीने बेसुमार वाळू उपसा होत असून त्यामुळे रस्ते, नदीपात्र खराब होऊन मोठे खड्डे पडणे, मोठ्या ट्रकने भरधाव वेगात वाळू वाहतुकीमुळे सतत अपघात होतात, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत महसूल अधिकारी, पोलीस प्रशासन व कंत्राटदार यांचे संगनमताने वाळू उपशाकडे दूर्लक्ष केल्यामुळे शासनाचा महसूल बुडत आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी असणाऱ्या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महसूल विभागातील कक्ष अधिकारी यांचा एजंटच्या घरी महसूल खात्याच्या स 80 फाईल्स आढळून आल्याबाबत**

**(१०) * २०३७ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) दिनांक 29 ऑक्टोंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास 23 लाखांच्या लाच घेतल्या प्रकरणी महसूल विभागातील कक्ष अधिकारी संजय नामदेव सुराडकर यांचा एजंट वैभव आधळे यांच्या घरी महसूल खात्याच्या जवळपास ८० फाईल्स आढळून आल्या हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले त्यानूसार संबधितावर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**खरोसा (ता.लातूर, जि.औसा) गावातील डोंगररॉयल्टीच्या नावाखाली खोदले जात असल्याबाबत**

**(११) * १३१४ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) औसा तालुक्यातील (जि.लातूर) खरोसा या गावाला लाभलेले नैसर्गिक सौंदर्य नष्ट होत असून रॉयल्टीच्या नावाखाली येथील डोंगर खोदले जात असल्याचे माहे जून, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू भागात अनेक डोंगर असून तेथे देवदेवतांची मंदिरे व सहाव्या शतकात कोरलेल्या सुरे लेण्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, गौण खनिज म्हणून डोंगराच्या मातीचा वापर केला जात असून लाखो ट्रक मुरुम खोदल्याने डोंगरावर खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(5) चौकशीनुसार सदरहू डोंगरांचे रक्षण करण्याकरीता व खोदकाम थांबविण्याकरीता शासन काय कार्यवाही करीत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(2) हे खरे आहे.
(3) व (4) देवदेवतांची मंदिरे व पुरातन लेण्याच्या परिसराची उप विभागीय अधिकारी औसा - रेणापूर यांनी पंचासमक्ष पाहणी केली असता, खोदकाम झाल्याचे दिसून आले नाही.
(5) सदर भाग वन विभागास अभिहस्तांकित केलेला असून, त्यातून उत्खनन करण्यात येत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ यांनी दूध भुकटी प्रकल्पासाठी मौजे वखंड (ता.दौड, जि.पुणे) येथील राखीव जमिन बनावट कागदपत्रे तयार करुन सदर जमिनीवर बेकायदेशीर दूध भुकटी प्रकल्प सुरु केल्याबाबत

**(१२) * २२६० श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) पुणे जिल्हा सहकारी दूध उप्तादक संघ मर्या. कायम डेअरी यांनी दूध भुकटी प्रकण्यासाठी मौजे वखंड (ता.दौड, जि.पुणे) येथील राखीव जमिनीपैकी 2 हेक्टर 52 आर ऐवजी जमिन मिळाल्यानंतर दूध उत्पादक संघाच्या गाव कामगार, तलाठी व खंड चेअरमन व संचालक यांनी बनावट कागदपत्रे तयार करुन दुय्यम निबंधक यांची फसवणूक करुन ४ एकर जमिन महाराष्ट्र राज्य दूध संघात हस्तांतरीत करुन सदर जमिनीवर कोट्यवधी रुपये खर्च करुन बेकायदेशीर ९ मजली इमारत उभारुन दूध भुकटी प्रकल्प सुरु केला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषीवर आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. दूध भुकटी प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबत रितसर करारनामा दूध महासंघाने केला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयात एकूण 907**
**उद्योग असून त्यापैकी 207 उदयोग बंद पडत असणे**

**(१३) * ९२१ श्री.संजय कदम (दापोली), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयात एकूण 907 उदयोग असून त्यापैकी 207 उदयोग डबघाईस (बंद पडण्याच्या अवस्थेत) आले आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर उद्योगात काम करणाऱ्या कामगारांवर उपासमारीची वेळ येऊ नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (1) सिंधुदुर्ग जिल्हयात एकूण १६९१ उद्योग नोंदणीकृत असून त्यापैकी १९५ उद्योग बंद आहेत.
रत्नागिरी जिल्हयात एकूण २२०९ उद्योग नोंदणीकृत असून त्यापैकी २७२ उद्योग बंद आहेत.,
(२) व (३) बंद उद्योगांची चौकशी करण्यात येत नाही परंतू उद्योग बंद आढळल्यास अशा उद्योगाची नोंदणी रद्द करण्यात येते. उदयोग घटकांची प्रगणना २००८ मध्ये झाल्यानंतररत्नागिरी जिल्हयात नवीन १०८५ उद्योग नोंदणीकृत झाले असल्यामुळे बंद पडलेल्या उद्योगांतील कामगारांना नवीन उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिमा व सिना नदीतून (ता.मोहोळ, जि.सोलापूर) वाळूची तस्करी**
**रोखण्यासाठी बसविण्यात आलेले सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद केल्याबाबत**

**(१४) * ९४४ श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मोहोळ तालुक्यात (जि.सोलापूर) येथील भिमा व सिना नदीवर वाळूची तस्करी होवू नये म्हणून सी.सी.टी.व्ही (कॅमेरे) बसविले असता सदर सी.सी.टीव्ही (कॅमेरे) बंद करुन अधिकाऱ्यांशी संगनमत करुन वाळूची तस्करी होत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर वाळूची होत असलेली तस्करी रोखणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे चाटोरी (ता.निफाड, जि.नाशिक) येथील पूरपिडीत लोकांसाठी**
**शासनाने नवीन गावठान म्हणून संपादित केलेल्या जमिनीबाबत**

**(१५) * १२६१ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे चाटोरी (ता.निफाड, जि.नाशिक) येथील पूरपिडीत लोकांसाठी शासनाने गट नं ५७०/१, ५७१/१, ६०९/१, ६१७/१, ६१८, ६२४ अ, ६२४ ब व ६२५/१ याप्रमाणे एकुण क्षेत्र 9 हेक्टर, 47 आर नवीन गावठान म्हणून संपादित केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर गटांवर सातबारा उताऱ्यावर नवीन गावठान नोंद झालेली असून उपविभागीय अधिकारी यांचा आदेश क्र.आरटीएस 193/07, दिनांक 18 फेब्रुवारी, 2009 या आदेशाने तहसिलदार यांना सदर प्लॉटचे तत्काळ वाटप करण्याचे आदेश देण्यात आले आहे , हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, आदेश देऊन 5 ते 6 वर्षे झाली तरी प्लॉट वाटप प्रक्रिया पूर्ण न झाल्याने सदर जमिनीवर अतिक्रमण करुन इतर शेतकऱ्यांकडून व लगतच्या लोकांकडून नांगरणी, वखरणी व पेरणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी पूरपिडीतांनी तसेच स्थानिक ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी, नाशिक, तहसिलदार, निफाड, प्रांताधिकारी, निफाड यांच्याकडे अनेक वेळा केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली आहे व सदर जमिनी शासनाने घेतल्या आहेत काय वा सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने अतिक्रमण निष्काषनाची कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून सुरु असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील वर्धा पॅटर्नने दारु विक्री सुरु असल्याबाबत

**(१६) * १२६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दारु बंदी करण्याची घोषणा मा.अर्थ मंत्री यांनी दिनांक ४ नोव्हेंबर,२०१४ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा आणि गडचिरोली जिल्हयात दारुबंदी असून ती फक्त कागदावरच आहे. विर्दभात दारु बंदी सुरु केली तरी अवैध मार्गाने दारु विक्री चालू असून चंद्रपूर जिल्हयात वर्धा पॅटर्न ने दारुविक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअती उक्त ठिकाणी दारु विक्री चालू ठेवणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे

(५) असल्यास, दारुबंदी करण्याबाबत शासनाने तात्काळ कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४), (5) व (6) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अवकाळी पावसामुळे खरीपातील सोयाबीन, ज्वारी, भुईमूग आणि भात पिके तसेच द्राक्ष, डाळीब व इतर फळांची नासधूस होऊन कोट्यावधी रूपयांचे झालेले नुकसान**

**(१७) * ६२३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :**
सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यात विशेषतः नागपूर, ठाणे, पालघर, सांगली, नाशिकसह कोकणातील विविध ठिकाणी ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2014 मध्ये झालेल्या पावसामुळे खरीपातील सोयाबीन, ज्वारी, भुईमूग आणि भात पिके तसेच द्राक्ष, डाळीब व इतर फळांची नासधूस होऊन शेतक-यांचे कोटयवधी रूपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3)असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत शेतक-यांना आवश्यक मदत देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशंतः खरे आहे.
(२) होय.
(३) प्राथमिक अदांजानुसार राज्यात अवकाळी पावसामुळे माहे नोव्हेंबर-२०१४ मध्ये ज्या`क्षत्रावरील शेतीपिके व फळपिकांचे नुकसान झालेले आहे, त्या नुकसानीचे पंचनामे अतिम करण्याचे काम सुरु असून अतिम अहवाल प्राप्त होताच बाधित`क्षत्रास मदत देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्ह्यातील अप्रमाणित कृषी निविष्ठा नमुने प्रकरणात खटले दाखल करण्यास कृषी खात्याने केलेली टाळाटाळ**

**(१८) * १५१ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :**
सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) हिंगोली जिल्ह्यातील अप्रमाणित कृषी निविष्ठा नमूने प्रकरणात खटले दाखल करण्यास कृषी खाताने टाळाटाळ करीत असल्याने हिंगोलीसह लातूर, उस्मानाबाद, परभणी,नांदेड जिल्ह्यातील कृषी विभागाने त्वरीत खटले दाखल करा, अन्यथा हलगर्जीपणा करणाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल असे आदेश कृषी सहसंचालकांनी दिल्याचे माहे ऑक्टोबर,2014 वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, अद्यापपर्यंत किती कंपन्यांवर खटले दाखल करण्यात आले आहे,
(3) असल्यास, अद्यापपावेतो खटले दाखल करण्यास दिरंगाई करणाऱ्या कृषि अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** १) होय.
२) अद्यापपर्यंत ९४ कंपन्यांवर खटले दाखल करण्यात आले आहेत.

३) खटले दाखल करण्यास दिरंगाई झालेली नाही.
४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खडकवासला मतदार संघातील (जि.पुणे) नऱ्हे- आबेगांव परिसरात सहामजली इमारत कोसळून तरुणाचा झालेला मृत्यू**

**(१९) * ११५७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) खडकवासला मतदार संघातील (जि.पुणे) नऱ्हे- आबेगांव परिसरात सहा मजली इमारत कोसळून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, 2014 च्या शेवटच्या आठवड्यात घडली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या इमारतीचे काही मजले अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन अनधिकृत आणि निकृष्ट बांधकाम करणा-या कंत्राटदार व बिल्डरवर गुन्हा दाखल केला आहे काय,
(4) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(2) होय.
(3) होय.
(4) पुढील कार्यवाही पोलीस विभागामार्फत सुरु आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) येथील खाडीतून मोठया प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा करुन शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत**

**(२०) * ८८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) येथील खाडीतून मोठया प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा करण्यात येवून शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडविण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध होत असलेला वाळू उपसा थांबविण्याबाबत तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) तहसिलदार कल्याण यांच्या पथकाने दि. 22 सप्टेंबर, 2014 रोजी खाडी किनारी रेती बंदर येथे वाळूचे अवैध उत्खननावर कारवाई करुन 1037 ब्रास वाळूसाठा जप्त केला आहे. तसेच वाळूचा आळा करण्यासाठी वापरण्यात आलेली यंत्रसामुग्री नष्ट करुन, 14 इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(2) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी जिल्हा/उपविभाग/तहसिल स्तरावर भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येत आहे. कल्याण तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणात एप्रिल, 2014 ते नोव्हेंबर, 2014 मध्ये रुपये 2.32 कोटी इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयात अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांकडून दंडाची रक्कम वसूल करणेबाबत**

**(२१) * ४१८ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) यवतमाळ जिल्हयाच्या उमरखेड आणि महागाव तहसील अतंर्गत अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात सुमारे ४१ लाख रुपयाचा दंड आकारण्यात आला , हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील दंडाची रक्कमेपैकी फक्त १३ लाख रुपये वसूल झाल्यानंतर महसूल अधिकाऱ्यांसोबत नियमबाह्य उत्खनन करणाऱ्यांनी संगनमत केल्याने उर्वरित दंडाची रक्कम वसुल झालेली नाही, हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदरील प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार आकारली गेलेली दंडाची रक्कम वसुल झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) (2) (3) व (4) यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि महागांव तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूक प्रकरणात रुपये 41,84,970/- एवढा दंड आकरण्यात आला आहे. त्यापैकी रुपये 11,76,540/- एवढया दंडाची वसुली करण्यात आलेली नसून, उर्वरित दंड वसुलीबाबतची कार्यवाही महराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील तरतूदीनुसार सुरु आहे.

-----------------

**कुरकुंभ (ता.दौड.जि.पुणे) औद्योगिक वसाहतीतील रासायनिक प्रकल्पांमधून सोडण्यात येणा-या दुषित सांडपाण्यामुळे व वायुमुळे होणारे प्रदूषण**

**(२२) * १२८६ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कुरकुंभ (ता.दौड, जि.पुणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उभारलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये 80 टक्के प्रकल्प रासायनिक असून या रासायनिक प्रकल्पातून निघणा-या रसायन मिश्रीत दुषित सांडपाण्यामुळे कुरकुंभ, पांढरेवाडी, मळद व गिरीम परिसरामध्ये पाण्याचे उद्भव दुषीत झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच औद्योगिक वसाहतीतील रासायनिक प्रकल्पांमधून सोडण्यात येणा-या दूषित सांडपाण्यामुळे होणारे प्रदूषण व या वसाहतीमुळे निर्माण झालेल्या समस्यांबाबत उपाययोजना करण्यासंदर्भात दिनांक 15 फेब्रुवारी, 2008 रोजी वा त्यासुमारास तत्कालीन उदयोग राज्यमंत्री व तत्कालीन लोकप्रतिनिधी यांनी या औद्योगिक वसाहतीस भेट देवून या वसाहतीमुळे निर्माण झालेल्या समस्यांची ग्रामस्थांच्या समवेत केलेल्या पहाणीनुसार व त्यानंतर घेतलेल्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार व

उपस्थित करण्यात आलेल्या 9 मुद्यांवर अद्यापही शासनाने  कार्यवाही केली नसल्याची कारणे काय आहे,
(3) कुरकुंभ औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक प्रकल्पातून निघणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी एक कोटी चाळीस लाख रुपये खर्च करुन सुधारित सामुहिक सांडपाणी प्रकल्प उभारुनही या परिसरातील पाण्यांचे उद्भव दुषीत होण्याची कारणे काय आहेत,
(4) कुरकुंभ औदयोगिक वसाहत परिसरातील कुरकुंभ, पांढरेवाडी, मळद व गिरीम परिसरातील पाण्याचे उद्भव दुषीत होवू नयेत याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे तसेच या औद्योगिक वसाहतीतील रासायनिक प्रकल्पामधून मोठ्या प्रमाणावर होणारे वायु प्रदुषण थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) कुरकुंभ येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमधील औद्योगिक प्रकल्पातून निघणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता मोठ्या उद्योगांनी स्वत:ची सयंत्रणा उभारली असून सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा देखील अस्तित्वात आहे. लघु व मध्यम उद्योगासाठी देखील सामाईक सांडपाणी प्रक्रिया आहे. तथापि, या परिसरातील पाण्याचे उद्भव दुषित झालेले आहेत किंवा ही बाब संबंधित यंत्रणेकडून तपासण्यात येत आहे.
(२) तत्कालीन राज्यमंत्री (उद्योग) यांच्याकडे दिनांक १५/०२/२००८ रोजी झालेल्या बैठकीत उपस्थित करण्यात आलेले ९ मुद्यांपैकी ५ मुद्यांवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून उर्वरित ४ मुद्यांबाबत संबंधित विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) कुरकुंभ औद्योगिक वसाहतीमध्ये उभारण्यात आलेली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यरत असून प्रक्रियाकृत सांडपाण्याची गुणवत्ता ही सर्वसाधारण मर्यादेत आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी औद्योगिक वसाहतीच्या परिसराच्या नजिकच्या गावातील पाण्याचे नमूने तपासण्यात येत असून पाण्याची गुणवत्ता सर्वसाधारण असल्याचे दिसून आले आहे.
(४) कुरकुंभ औद्योगिक वसाहतीमध्ये निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता मोठ्या उद्योगांकडे स्वत:ची सयंत्रणा उभारलेली असून पुढील विल्हेवाटीकरीता सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये सोडण्यात येते. तसेच लघु व मध्यम उद्योगासाठी सामायिक सांडपाणी प्रक्रिया बसवण्यात आली असून सदर सयंत्रणेमध्ये सन २०१२ मध्ये सुधारणा केली आहे (Upgradation) अशाप्रमाणे प्रक्रियायुक्त सांडपाणी औद्योगिक परिसरामध्ये बागबगीच्याकरीता वापरण्यात येते. तसेच ज्या कारखान्यांकडून जल अथवा वायू प्रदूषण होत असल्याचे आढळून येते. अशा कारखान्यांवर जल व वायू प्रदुषण प्रतिबंध कायदा १९७४ नुसार कार्यवाही करण्यात येते.
५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खनिज विकास कार्यक्रमांतर्गत पुरंदर आणि हवेली तालुक्यातील विकासकामांना निधी मिळाण्याबाबत....

**(२३) * ७३९** : सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) खनिज विकास कार्यक्रमांतर्गत पुरंदर आणि हवेली तालुक्यातील विकासकामांना निधी मिळावा अशी मागणी स्थानिक वि.स.स. यांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे मे,2013, ऑगस्ट,2013 आणि ऑक्टोबर,2013 मध्ये केली हे खरे आहे काय?

(2) असल्यास या भागात मोठ्या प्रमाणात होणारे खनिज उत्खनन लक्षात घेऊन शासन येथील विकासकामांना जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय?
(3) असल्यास किती कालावधीत देण्यात येणार आहे
(4) नसल्यास का?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**उप अधिक्षक भूमी अभिलेख (ता.खेड, जि.रत्नागिरी) यांनी नियमाबाह्य पध्दतीने काम करुन केलेला भ्रष्टाचार**

**(२४) * १७७५ श्री.प्रकाश (बाळा) सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) ता.खेड, जि.रत्नागिरीचे श्री. आर.एल..कदम उप अधिक्षक भूमी अभिलेख यांच्या नियमाबाह्य पध्दतीने भू-मोजणी करणे, ख-या वस्तूस्थितीला टाळून एकतर्फी आर्थिक देवाणघेवाणीतून निर्णय देणे तसेच तक्रार धारकास अपशब्द व शिवीगाळ करुन अपमानास्पद वागणूक देणे तसेच लोकप्रतिनिधीच्या पत्राची दखल न घेणे या गैरकारभाराची सखोल चौकशी करावी अशी मागणी दापोली व खेडचे लोकप्रतिनिधी तसेच मुंबईतील लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा. महसूल मंत्री , राज्यमंत्री , मा. पालकमंत्री रत्नागिरी व जिल्हाधिकारी तसेच जिल्हाधिक्षक भू-अभिलेख रत्नागिरी यांच्याकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी व त्यानंतर वारंवार लेखी निवेदनाव्दारे केली आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, रत्नागिरी यांच्याकडे दिनांक 28.2.2014 रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) मोजणीतील अनियमिततेबाबत संबंधित उप अधीक्षक, भूमि अभिलेख, खेड यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १० मधील तरतूदीनुसार शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

-----------------

**कागल-हातकणंगले (जि.कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्प कायमचा बंद करण्याची नागरिकांनी केलेली मागणी**

**(२५) * २८३४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कागल-हातकणंगले (जि.कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पाने तळंदगे ग्रामपंचायतीचा सुमारे 40 लाखाचा कर थकविला असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, यामुळे ही ग्रामपंचायत आर्थिक संकटात सापडली असून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणारा हा धोकादायक प्रकल्प कायमचा बंद करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधिताकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(4) चौकशीनुसार पुढे संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही. ग्रामपंचायतीने कमाल दराने सन २००८-०९ ते सन २०१४-१५ या ६ वर्षाच्या कालावधीची रु.३९,३२,९५७/- इतकी एकूण कराच्या रक्कमेची मागणी दि. ९/१०/२०१४ रोजी महामंडळाकडे केली होती. तथापि, प्रस्तुत प्रकरणी महामंडळ व ग्रामपंचायत पदाधिका-यासोबत दि. १९/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत रु ३.०० लक्ष प्रतिवर्षी कर देण्याचे निश्चित झाले होते. त्यानुसार महामंडळाने सन २००९-१० ते २०१४-१५ या ६ वर्षाच्या कालावधीत रु १८ लक्ष इतकी करापोटी थकबाकीची रक्कम ग्रामपंचायतीस देणे अभिप्रेत होते. त्यानुसार महामंडळाने ग्रामपंचायतीस दि १/१२/२०१४ रोजी सुधारित देयके पाठविण्यासंबंधी विनंती केली आहे.
(२) हे खरे नाही. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील मोठ्या उद्योजकांकडून तळदंगे ग्रामपंचायतीस करापोटी दरवर्षी मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो.
सदर सीईटीपी प्रकल्पामुळे पाणी दुषित झाले असून शेती नापीक झाल्याची तक्रार ग्रामपंचायतीने केली आहे. त्यामुळे सीईटीपीचे सांडपाणी सोडण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेला एचआरटीएस टप्पा क्र.१ ची क्षमता प्रक्रिया कमी पडत असल्यामुळे महामंडळाने एचआरटीएस टप्पा क्र.२ या प्रकल्पाचे काम हाती घेतले होते. परंतु त्यास ग्रामस्थांनी दि. ९/१/२०१४ रोजी विरोध करुन बंद पाडले आहे.
(३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीच्या १०.०० दशलक्ष घ.मी. क्षमतेचा सीईटीपी प्रकल्प मे. २०१२ पासून परिचालनासाठी कागल पंचतारांकित सीईटीपी को ऑफ असो, कसबा, सांगाव यांना व्दिपक्षीय करारनाम्याने हस्तांतरीत करण्यात आला होता. तथापि, सदर संस्था प्रकल्पाचे परिचालन व्यवस्थित करीत नसल्यामुळे उद्योजक व ग्रामस्थ यांच्या तक्रारी वाढत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महामंडळाने सदर प्रकल्प दि २५/९/२०१४ रोजी उद्योजकांच्या कागल हातकणंगले सीईटीपी यूजर इंडस्ट्रिज सहकारी सोसायटी, तळदंगे यांच्याकडे हस्तांतरीत केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे लोण (ता.भडगाव, जि.जळगाव) येथे गारपीटीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे बनावट असल्याबाबत**

**(२६) * ७५६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :**
सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) लोण (ता.भडगाव, जि.जळगाव) येथे गारपीट झाल्यानंतर प्रशासनाकडून नुकसानीचे जे पंचनामे करण्यात आले ते बनावट असल्याचे माहे मार्च,२०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सुमारे १० अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी बनावट पंचनाम्य विरुध्द प्रशासनाकडे तक्रार करूनही बनावट पंचनामे करणाऱ्यांवर कोणतीच कारवाई न झाल्याने या शेतकऱ्यांनी दिनांक १८ ऑगस्ट,२०१४ रोजी वा त्यासुमारास भडगाव तहसीलदारांच्या दालनात अंगावर रॉकेल ओतून स्वत:ला पेटवून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला हे खरे आहे काय,
(3) असल्यास ,तत्कालीन कृषी मंत्री यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेण्यासाठी कृषी अधिकारी व जिल्हाधिकारी यांना आदेश दिले हे खरे आहे काय,
(4) असल्यास, कृषी अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी संबंधितांविरुध्द तात्काळ कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) होय.
(2) होय, परंतू सदरची घटना दि. 18 जुलै, 2014 रोजी घडलेली आहे.
(3) होय.
(4) तालुका कृषि अधिकारी, भडगाव यांना सक्तीच्या रजेवर पाठविले होते. तसेच पंचनाम्यातील क्षत्राच्या त्रुटीबाबत महसूल यंत्रणेकडे चौकशी करण्यात येत आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात अवकाळी पावसामुळे भात, नाचणी, डाळीब, द्राक्ष, कांदा आदि फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(२७) * १९२० श्री.आर.आर.पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यात अवकाळी पावसामुळे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुस-या व तिस-या सप्ताहात तब्बल ४९ हजार हेक्टरवरील भात, नाचणी, कांदा आदि पिकांचे आणि डाळीब व द्राक्ष या फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(3) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :**

(१) अशंत: खरे आहे.
(२) होय.
(३) प्राथमिक अदांजानुसार राज्यात अवकाळी पावसामुळे माहे नोव्हेंबर-२०१४ मध्ये ज्या क्षत्रावरील शेतीपिके व फळपिकांचे नुकसान झालेले आहे. त्या नुकसानीचे पंचनामे अतिम करण्याचे काम सुरू असून संयुक्त स्वाक्षरीचे अतिम अहवाल प्राप्त होताच बाधित क्षत्रास मदत देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे नंदूरबार जिल्हयातून वाहणाऱ्या तापी नदीतून मोठया प्रमाणात होणारा वाळू उपसा**

**(२८) * ८२१ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे आणि नंदूरबार जिल्हयातून जाणाऱ्या तापी नदीवरुन मोठया प्रमाणावर वाळूच्या उपशा करण्याबाबत शासन दरवर्षी ठेका देत असून त्यातून कोटयवधीचा महसूल शासनाला मिळत असतो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातत्याने वाळूचा उपसा होत असल्याने तापी नदीच्या काठावरील गावांना मोठा धोका होत चालला असून नदीचे पात्र खोल होत असून वाळूचा उपसा मुळे दोन्ही जिल्हयातील रस्ता खराब झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वाळू उपस्यावर बंदी घालावी अशी मागणी जिल्हाधिकारी, धुळे आणि नंदूरबार यांच्याकडे सातत्याने विविध सामाजिक संघटना आणि राजकिय पक्षांनी वारंवार केली आहे याबाबत अनेकदा मोर्चे काढून आदोलने देखील केले आहेत हे खरे आहे काय,
(4) असल्यास, उक्त दोन्ही जिल्हयातून वाळूचा उपसा कायमचा बंद करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) वाळू/रेती निर्गती धोरण, शासन निर्णय धोरण, शासन निर्णय दिनांक १२/३/२०१३ मधील तरतूदीनूसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जिल्हा खनिकर्म अधिकारी व संबंधित तहसिलदार यांच्या संयुक्त पथकाद्वारे वाळूगटांचे सर्वेक्षण करण्यात येते. सर्वेक्षणानंतर उत्खननास योग्य असलेल्या वाळू रेती गटाबाबत पर्यावरण अनुमती घेऊन, रितसर लिलाव करुन सदरचा लिलाव सर्वोच्च बोलीधारकास मंजूर करण्यात येतो. रस्ते दुरुस्तीकरीता जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त प्रस्तावानुसार महाराष्ट्र गौण खनिज विकास निधीमधून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
(३) नंदूरबार जिल्हयातील वाळूगटातून उत्खननास बंदी घालावी याबाबत लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे.
(४) व (५) राज्यातील पायाभूत सुविधांच्या कामांसाठी गौण खनिज आवश्यक आहे. गौण खनिजाचे उत्खनन भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या शिफारशीनंतर पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानतर करण्यात येते.

-----------------

**महात्मा फुले कृषी विद्यापीठात प्रलंबीत मजूर करती**

**(२९) * ११२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यात महात्मा फुले कृषी विद्यापीठात मागासवर्गीय मजूर भरतीसाठी २० हजाराहूनही अधिक लाभार्थी उमेदवारांनी रु.२५० शुल्क भरूनही परिक्षा वारंवार प्रलंबीत रहात असल्याने बेरोजगार तरूणांमध्ये नाराजी पसरली असल्याचे दिनांक १९ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, गेल्या साडेतीन वर्षापासून हजारो तरूण कृषी विद्यापीठ प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष लावून बसले आहेत, हे ही खरे आहे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय ,
(4) असल्यास,चौकाशीच्या अनुषंगाने बेरोजगार तरूणांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अशंत: खरे आहे.
(३) व (४) महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी यांचेकडील मजूर भरतीच्या अनुषंगाने आवश्यक ते मार्गदर्शन त्यांना करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीमधील अनेक भूखंड वापराविना पडून असल्याबाबत**

**(३०) * १३९४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीमधील अनेक भूखंड उद्योजकांना व्यवसायासाठी दिलेले असतांना आजही वापराविना पडून असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त दोन्ही जिल्हयातील अशा 237 उद्योजक लाभार्थी भूखंडधारकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर कारणे दाखवा नोटीसांना किती उद्योजकांनी उत्तरे दिली आहेत व किती उद्योजकांनी कारणे दाखवा नोटीसांना उत्तरे दिली नाहीत,
(4) असल्यास, किती भूखंडधारकांकडून भुखंड परत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** १) होय, हे खरे आहे.
२) व ३) २३७ उद्योजकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या होत्या, त्यापैकी ५३ उद्योजकांनी नोटीसीला उत्तरे दिलेली आहेत. तर १८४ उद्योजकांनी उत्तरे दिलेली नाहीत.
४) महामंडळाने एकूण १०७ भूखंडाचे पंचनामे करुन भूखंड ताब्यात घेतले असून ९ भूखंडधारकांना करारनाम्यातील अटीनुसार भूखंड ताब्यात घेण्यासंदर्भात पहिली नोटीस दिली आहे. तर ६८ भूखंडधारकांना दिलेल्या नोटीस टपाल खात्याकडून परत आल्या आहेत. त्यासंदर्भात महामंडळाच्या नियमानुसार त्यांच्याविरुध्द पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
५) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**रांजणगाव गणपती (ता.शिरुर, जि.पुणे) येथील पंचातारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये जवळपास 250 पेक्षा जास्त कंपन्यांमध्ये 50 टक्केपेक्षा जास्त महिला कामगार असल्याबाबत**

**(३१) * ४५५ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) रांजणगाव गणपती (ता.शिरुर, जि.पुणे) येथील पंचातारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये जवळपास २५० पेक्षा जास्त कंपन्यांमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त महिला कामगार काम करत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रांजणगाव पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये बहुतांशी कंपन्यांत कंत्राटी व कायम स्वरुपी महिला कामगार असून या कंत्राटी महिला कामगारांचे व्यवस्थापन व ठेकेदाराकडून आर्थिक व शारिरीक शोषण होत असल्याची माहिती दिनांक ४ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रांजणगाव पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक कंपन्यामध्ये भंगाराच्या कंत्राट घेण्यावरुन स्थानिक गुंडाकडून दहशत निर्माण केली जात आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) नाही.
संबंधीत पोलिस स्टेशनला अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे दिसून आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**अकोला, नाशिक व उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांचे निकृष्ट दर्जाच्या सोयाबिन बियाण्यामुळे झालेले नुकसान**

**(३२) * ११८८ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात सोयाबिनचे बियाणे बनावट निघाल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अद्यापही मिळाली नसल्याचे निर्दशनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) नाशिक जिल्हयात खरीप हंगामात पेरलेले सोयाबिन बियाणे निकृष्ट दर्जाचे निघाल्याने या प्रकरणी आतापर्यंत जिल्हयातील १६७ शेतकऱ्यांनी दिनांक 3 नोव्हेंबर,2014 रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत सदर तक्रारीत कृषीधन ८७, महाबीज ७२, सारस ३, पाटीदार, विदल, किर्तीमान, ग्रीन गोल्ड प्रत्येकी एक तक्रार याप्रमाणे सदर कंपन्याच्या बियाणांबाबत तक्रारीचा समावेश आहे हे खरे आहे काय,
(३) तसेच उस्मानाबाद जिल्हयात विविध कंपन्यांव्दारे पुरविण्यात आलेले सोयाबिन बियाणे न उगविल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सोयाबिनचे निकृष्ट दर्जाचे बियाणांमुळे पीक वाया गेले असे तक्रारीत नमूद करुन त्वरीत नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली हे खरे आहे काय,
(५) असल्यास, जिल्हयातील शेतकऱ्यांनी वारंवार आदोंलने तसेच निवेदने देवूनही याबाबत संबंधित कंपन्याविरुध्द कृषी अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही हे खरे आहे काय,
(६) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे बियाणे पुरविण्याऱ्या सदर कंपन्यावर कारवाई करण्याबाबत तसेच तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) नाशिक जिल्हयात सोयबीन बियाणे न उगवल्याबाबत, कृषिधन सीड्स-८७, महाबीज-७१, सारस-३, पीटादार-१, इगल-२, बन्सल-१, प्रगती-१, ग्रीनगोल्ड-१, या कंपन्याबाबत एकूण १६७ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(३) होय.
(४) होय.
(५) हे खरे नाही.
संबंधित कंपन्यांविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.
(६) ज्या कंपन्यांच्या सोयाबीन बियाणे उगवणीबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्या कंपन्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांची सुनावणी घेण्याची कार्यवाही चालू आहे. सोयाबीन बियाणे न उगविल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने काही कंपन्यांनी संबंधित तक्रारदार शेतकऱ्यांस कंपनीमार्फत वेळीच बियाणे बँग बदलून देणे तथा रोख स्वरुपात भरपाई देण्याची कार्यवाही केलेली आहे. नाशिक, अकोला, उस्मानाबाद जिल्हयातील गुण नियंत्रण निरीक्षकांनी सोयाबीन बियाण्याचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासून घेतले आहेत. अप्रमाणित नमुन्यांबाबत कंपन्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येऊन त्यांचे विरुध्द न्यायालयीन दावा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयात उत्खननास बंदी असताना चिरा दगडाचे उत्खनन करून वाहतूक होत असल्याबाबत**

**(३३) * ६७५ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) रत्नागिरी जिल्हयात इकोसेन्सिटीव्ह झोनमुळे चिरेखाण उत्खननास बंदी असताना राजापूर, लांजा, संगमेश्वर, खेड आणि दापोली तालुक्यात चिरा दगडाचे उत्खनन करून वाहतूक होत असल्याचे माहे ऑक्टोबर २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अनधिकृतरित्या चिरा दगडाची तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) माहे ऑक्टोबर, 2014 च्या शेवटच्या सप्ताहात अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि रत्नागिरी जिल्हयात एप्रिल, 2014 ते ऑक्टोबर, 2014 या कालावधीत गौण खनिज अवैध उत्खनन / वाहतूकीच्या 378 प्रकरणात रुपये 58.39 लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आरे कॉलनी परिसरात 1000 विद्यार्थी क्षमतेच्या वसतीगृह उभारण्याबाबत**

**(३४) * ५७०** : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) आरे कॉलनी परिसरात 1000 विद्यार्थी क्षमतेच्या वसतीगृह उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला असता सदरहू ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यास काही अडचणी असल्यामुळे तसेच कलिना, मुंबई येथे वसतिगृह उभारण्याकरिता आदिवासी विकास विभागास मुंबई विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर सदरहू प्रस्तावित वसतिगृह उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय?
(2) असल्यास, आरे कॉलनी येथील वसतीगृहासाठी प्रस्तावित असलेली जागा ही अन्य कंत्राटदाराला चारा उत्पादनासाठी भाडेतत्वावर दिलेली असल्याने तसेच सदरहू जागेभोवती स्मशानभूमी असल्याचे कारण देवून ही जागा वसतिगृहासाठी देण्याचे नाकारण्सात येत आहे, हे खरे आहे काय?
(3) सदरहू परिसरात आदिवासी बांधवांचे असलेले वास्तव्य लक्षात घेता ही जागा आदिवासी विद्यार्थी वसतिगृहासाठी सुयोग्य व सुलभ असल्याने सदरहू ठिकाणी वसतिगृह उभारणीस मान्यता देण्याची मागणी स्थानिक जनता व लोकप्रतिनिधीकडून देण्याची होत असलेल्या मागणीनुसार आरे कॉलनी येथे वसतीगृह उभारण्याची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत आदिवासी विभागाकडून वारंवार मागविण्यात आलेला प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय?
(4) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे?
(5) सदरहू प्रस्ताव अप्राप्त असल्यास, त्याची कारणे काय आहेत व उपरोक्त दोन्ही ठिकाणी वसतिगृह उभारण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) हे खरे आहे.
(2) हे खरे नाही.
(3) संपूर्ण आरे दुग्धवसाहतीचा परिसर हा ना विकास`क्षेत्र व हरित पट्ट्यात मोडतो. या ठिकाणी आश्रम शाळेकरीता 5 एकर जागा उपलब्ध करुन देण्याची बाब ही धोरणात्मक आहे.
(4) व (5) आदिवासी मुलांकरिता 2000 एवढ्या क्षमतेचे वसतीगृह उभारण्यसाठी मुंबई विद्यापीठ परिसरात जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.21/02/2012 रोजी झालेल्या बैठकीत मुंबई विद्यापीठाला आदेश देण्यात आले आहेत. त्यामुहे प्रस्तुत प्रकरणी मुंबई विद्यापीठामार्फत पुढील कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

-----------------

## औरंगाबाद परिसरातील बिडकिन येथील 450 एकर गायरान शासकीय जमीन, शासनालाच विक्री करून कोट्यवधी रूपयांचा झालेला गैरव्यवहार

**(३५) * २१०४ श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) औरंगाबाद परिसरातील बिडकिन येथील 450 एकर गायरान शासकीय जमीन, शासनालाच विक्री करून कोट्यवधी रूपयांचा केलेला गैरव्यवहार लगतच्या काळात निदर्शनास आला आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, संबंधित तलाठी, सब रजिस्टार व शासकीय अधिकारी यांनी वेळीच योग्य ती नोंद न घेतल्यामुळे शासनाचे कोटयवधी रूपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, या संपूर्ण गैरव्यवहाराबाबत दोषी असणाऱ्या व्यक्तीवर तसेच शासनाच्या नुकसानीची रक्कम परत मिळविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) हे खरे नाही.
(2) हे खरे नाही
(3) प्रश्नच उद्भवत नाही.
(4) प्रश्नच उद्भत नाही.

-----------------

**रेणा मध्यम प्रकल्पासाठी कामखेडा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील शेतक-यांच्या जमिनी संपादित करुन जमिनीचा मोबदला प्रकल्पग्रस्त शेतक-यांना देण्यात आला नसल्याबाबत**

**(३६) * १३१५ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) रेणा मध्यम प्रकल्पासाठी कामखेडा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील शेतक-यांच्या जमिनी संपादित करुन 20 वर्षे होत आली तरी अद्याप येथील प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला प्रकल्पग्रस्त शेतक-यांना देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, जिल्हा न्यायालयाने मावेजा संदर्भात आदेश देऊन तीन वर्षांचा कालावधी झाला असून शेतक-यांना पैसे मिळाले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदरहू शेतक-यांना तातडीने जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** १) हे खरे नाही.
मौ.कामखेडा ता.रेणापूर येथील एकूण ४ भूसंपादन प्रकरणांपैकी २ प्रकरणात सन १९९९ मध्ये व उर्वरित २ प्रकरणांमध्ये सन २००२ मध्ये निवाडा जाहीर करुन मावेजा वाटप करण्यात आलेला आहे.
२) अशंत: खरे आहे.
भूसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम ११ खालील निवाड्यात अदा केलेल्या रकमेविरुध्द वाढीव मावेजासाठी भूधारक मा.दिवाणी न्यायालयात सन २०००-२००१ मध्ये गेल्यामूळे मा.दिवाणी न्यायालयाने सन २००७ ते २०११मध्ये दिलेल्या निकालाप्रमाणे एकूण ३० पैकी मा. उच्च न्यायालयात आपील करुन ७ भूसंदर्भ संचामध्ये ५०% मावेजा न्यायालयात जमा करण्यात आला आहे.
३) मौ. कामखेडा ता.रेणापूर या गावाच्या ३० भूसंदर्भ संचातील १५६ प्रकरणांत न्यायालयाचा निर्णय झालेला आहे व त्यापैकी ७ भूसंदर्भ ग्रुपमधील ३९ शेतकरी यांना रु. २.३७ कोटळी मावेजा मा.न्यायालयात जमा करण्यात आलेला आहे.
उर्वरीत २३ भूसंदर्भ ग्रुपपैकी अ) शासनाकडे मागणी केलेल्या २ भूसंदर्भ ग्रुपमधील २२ भूधारकांपैकी ९ भूधारकांना भूसंदर्भ क्र. ९५०/२००० व इतर ८ प्रकरणी शासन निर्णय क्र. भूसंमो-१०/२०१४/८६७४/प्र.क्र.६७/अ-२ दि.३.१२.२०१४ अन्वये रु. ६.६४ कोटी उपलब्ध करुन दिलेले आहेत. तसेच भूसंदर्भ क्र.२२५/२००० व इतर ७ मध्ये उपस्थित त्रुटीच्या अनुषंगाने अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांना कळविले आहे. त्रुटीची पूर्तता झाल्यावर वित्त विभागाच्या दि.१२.८.२०१४ च्या परिपत्रकांन्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल.
ब) ५ भूसंदर्भ ग्रुपमधील २६ प्रकरणात निधी मागणी भूसंपादन यंत्रणा कार्यकारी अभियंता, लातूर मध्यम प्रकल्प, लातूर यांचेकडे करण्यात आली आहे. क) ७ भूसंदर्भ ग्रुपमधील

३७ प्रकरणात मा. उच्च न्यायालयात अपील केलेले आहे. ड) ४ भूसंदर्भ ग्रुपमधील २६ प्रकरणे अपीलाबाबतच्या सल्ल्यासाठी महामंडळाचे कायदा सल्लागार यांचेकडे प्रलंबित आहेत. इ) ५ भूसंदर्भ ग्रुपमधील ५ प्रकरणे अपील प्रस्तावासाठी प्रलंबित आहेत.

रेणा मध्यम प्रकल्पासाठी जमिनी ह्या गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ अतंर्गत कार्यकारी अभियंता लातूर, यांचेमार्फत संपादित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे महामंडळाने संपादक संस्था या नात्याने निधीची तरतूद महामंडळाकडून करण्यात येते त्याबाबत निधी उपलब्ध करुन देणेबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांचेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच ज्या प्रकरणांमध्ये मा.दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द शासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात येते त्या प्रकरणांमध्ये वित्त विभागाच्या दि.१२.८.२०१४ रोजीच्या परिपत्रकात दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी करुन विहीत पध्दतीने शासनातर्फे वित्त विभागाकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो.

५) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

### मोहोळ तालुक्यात अवकाळी पाऊस व ढगाळ वातावरणामुळे डाळीब, द्राक्ष, लिंबु याशिवाय अन्य फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत

**(३७) * ९५६ श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मोहोळ तालुक्यात (जि.सोलापूर) माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस व ढगाळ वातावरणामुळे डाळीब, द्राक्ष, लिंबु याशिवाय अन्य फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर नुकसानीबाबत शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(3) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसानीची आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) अशंत: खरे आहे.

(2) होय.

(3) सदर पंचनामे पुर्ण झाले असून या प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे. इ

(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नाशिक जिल्हयात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे झालेले नुकसानीबाबत

**(३८) * १२७४ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) नाशिक जिल्हयात दिनांक 13 व 14 नोव्हेंबर, 2014 रोजी झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे विशेषत: द्राक्ष बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशंत: खरे आहे.
(२) व (३) नाशिक जिल्ह्यातील नुकसानग्रस्त द्राक्ष बागांच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हयातील कुरणपिंप्री (ता.गेवराई) व पैठण तालुक्यातील आपेगाव या गावांना जोडणाऱ्या पुलाजवळ गोदावरी नदीपात्रात सुरु असलेला बेसुमार वाळू उपसा**

**(३९) * ६२६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) बीड जिल्हयातील कुरणपिंप्री (ता.गेवराई) व पैठण तालुक्यातील आपेगाव या गावांना जोडणाऱ्या पुलाजवळ गोदावरी नदीपात्रात सुरु असलेल्या बेसुमार वाळू उपसा होत असल्याचे दिनांक 10 नोव्हेंबर,2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) (२) व (३) अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तहसिलदार गेवराई यांचे भरारी पथकाने मौजे कुरणपिंप्री येथे केलेल्या कारवाईत व तहसिलदार वैजापूर यांनी मौजे आपेगांव येथे केलेल्या कारवाईत दिनांक १४/८/२०१४ ते दिनांक २१/१०/२०१४ या कालावधीत ६ प्रकरणात रुपये १,१८,८५०/- इतका दंड वसूल केला आहे. तसेच एका प्रकारणात पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे गोदणी ता. जि. यवतमाळ येथे विनापरवाना स्टोन क्रशरचे कोटयावधी रुपयांचे १० वर्षापासून करण्यात आलेले नियमबाहय उत्खनन**

**(४०) * ४१९ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) यवतमाळ शहरालगतच्या मौजे गोदणी (ता.जि.यवतमाळ) येथे विना परवाना १० वर्षापूर्वी स्टोन क्रशरची उभारणी करून शासनाच्या संमतीशिवाय कोट्यवधी रूपयांचे नियमबाहय उत्खनन केल्याचे तहसिलदार यवतमाळ यांचे दिनांक १२ सप्टेंबर,२०१४ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, प्राथमिक तपासणीत स्टोन क्रशर चालकांनी शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी शासनाकडून फौजदारी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत काय, तसेच नियमबाहय उत्खनन किती करण्यात आले याची देखील शासनाकडून चौकशी केली आहे काय,

(3)असल्यास चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अवैध पध्दतीने उत्खनन करणाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) यवतमाळ जिल्ह्यातील मौजे गोदणी येथील खनिपट्टयातून अवैध उत्खनन होत असल्याबाबत तहसिलदार यवतमाळ यांना तक्रार प्राप्त झाली होती. जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालयाकडून१४ खाणपट्टे मंजूर करण्यात आले आहेत.

उक्त तक्रारीच्या अनुषंगाने नियमानुसार आवश्यक कार्यवाहीच्या दृष्टीने १४ खाणपट्टयाचे मोजमाप करण्यासाठी पथकाची निर्मिती केली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) परिसरातील उद्योगपतीकडून महाराष्ट्र शेती जमिन धारण कमाल मर्यादा अधिनियम 1961 चे उल्लंघन करुन जमीन खरेदी केल्याबाबत...**

**(४१) * ७५७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) शासनाच्या महाराष्ट्र शेती जमिन धारण कमाल मर्यादा अधिनियम 1961 अन्वये 54 एकरपर्यंत जमिन एखादी व्यक्ती किंवा संस्थेच्या नावावर ठेवता येते , हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मुंबई येथील उद्योजक कयोमर्झ कावसा पालिया खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) परिसरातील खर्डीजवळ दळखण, काष्टी, धामणी व जरंडी या चार गावांच्या हद्दीत फेब्रुवारी, 2002 ते 2013 या कालावधीत 200 एकर जमिन खरेदी केली होती, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उद्योगपती कयोमर्झ कावस पालिया यांना शेतजमीन धारणा कमाल मर्यादेचे उल्लंघन करुन जमीन खरेदी करण्यास परवानगी कोणी दिली,
(4)असल्यास, ही बेकायदेशीर परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व उद्योगपती कयोमर्झ कावस पालिया यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(5) असल्यास, महाराष्ट्र शेतजमीन धारण मर्यादेचे उल्लंघन झालेल्या कयोमर्झ कावस पालीया यांचेकडील उर्वरित जमिनीसंबंधीत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) होय.
(३) सक्षम्य अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेली नाही.
(४) सन २००२ ते २०१३ दरम्यान फेरफार नोंद करणारे व मंजूर करणारे संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांची माहिती घेऊन त्यांच्यावर विभागीय चौकशीबात कार्यवाही सुरु आहे.
(५) कयामर्झ कावसा पालिया यांच्याकडील अतिरिक्त ठरणार १४६ एकर एवढे क्षेत्र सप्टेंबर २०१४ मध्ये शासनजमा करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने पुणे जिल्हयात तुकडे बंदी कायद्यातर्गत गुंठेवारी पध्दतीवर बंदी घालून खरेदी विक्रीचे व्यवहार नोद न करण्याबाबत दिलेले आदेश-**

**(४२) * ४६५ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) शासनाने पुणे जिल्हयात माहे मार्च 2010 पासुन तुकडे बंदी कायद्या अतंर्गत गुंठेवारी पध्दतीवर बंदी घालून 10 गुंठयापेक्षा कमी क्षत्राचे खरेदी विक्रीचे व्यवहारांचे नोंद न करण्याचे आदेश देण्यात आले आहे हे खरे आहे,

(2) असल्यास राज्यातील अनेक गोर - गरीब व मध्यमवर्गीय लोक एक ते दोन गुंठे जागा खरेदी करुन त्यावर घर बांधत असतात हे खरे आहे ,

(3) असल्यास राज्यातील गोरगरीब व मध्यमवर्गीय लोकांना स्वत:च्या जागेत घर बांधण्यासाठी तुकडे बंदी कायद्यात बदल करुन गुंठेवारी पध्दती पुन्हा सुरु करण्याबाबत शासन स्तरावरुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत 4)नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) हे खरे नाही.

(2) होय.

(3) मुंबई धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्यांचे एकत्रिकरण करणेबाबत अधिनियम 1947 निरसीत करण्याबाबत अथवा प्रमाणभूत `क्षत्र 1 आर करण्याबाबतची बाब शासनाच्या विचारधीन आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे कालुस्ते व गोवळकोट (ता.चिपळून, जि.रत्नागिरी) येथे बेकायदा वाळू उत्खनन झाल्याबाबत**

**(४३) * ६९९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे कालुस्ते व गोवळकोट (ता.चिपळून, जि.रत्नागिरी) येथे बेकायदा वाळू उत्खनन झाल्याचे माहे ऑक्टोबर,2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बेकायदा वाळू उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्हयातील मौजे कालुस्ते व मौजे गोवळकोट येथे विनापरवाना वाळूचा साठा करणाऱ्याविरुध्द रुपये १,९२,०००/- इतका दंड आकारुन, सदरचा दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उदगीर (जि.लातूर) येथील सोमनाथपूर येथील दारुची विक्री बंद करण्याबाबत**

**(४४) * १६७३ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) उदगीर (जि.लातूर) येथील सोमनाथपूर रस्त्यावर दारुबंदी उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय अनेक वर्षापासून कार्यरत आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर कार्यालय नेहमी बंद राहते, या कार्यालयाकडे वरिष्ठ अधिका-यांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे तसेच अधिकारी उपस्थित राहत नसल्यामुळे उदगीर विभागातील खेडयापाडयातून अवैध मद्यविक्री मोठया प्रमाणात वाढली आहे हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उदगीर विभागाचा पदभार "ब" विभागाच्या दुय्यम निरीक्षकाकडे असल्यामुळे खेडयापाडयातून दारुची विक्री होत असल्याने अनेकांचे कुटुंब उध्वस्त झाले आहे हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(5) असल्यास, चौकशीअती दारुची विक्री बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) होय.
(2), (3), (4) व (5) सदर कार्यालयासाठी 1 निरीक्षक, 2 दुय्यम निरीक्षक, 1 सहायक दुय्यम निरीक्षक, 3 जवान व 1 जवान-नि-वाहन चालक अशी विविध संवर्गातील पदे मंजूर व कार्यरत आहेत. सदर कार्यालय नेहमी बंद असते व त्याकडे वरिष्ठ अधिका-यांचे दुर्लक्ष होते, हे खरे नाही.

अवैध मद्य विक्री विरोधात या विभागाच्या अधिका-यांकडून प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली असून मागील तीन वर्षामध्ये एकूण 593 गुन्हे नोंदवून 163 आरोपीना अटक करण्यात आली आहे. तसेच एकूण 15,44,227/- इतक्या रकमेचा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे.
(6) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सिन्नर तालुक्यातील व्यापारी कुत्रिम टंचाई निर्माण करुन युरीयाची गोणी महागडया दराने विकत असल्याबाबत

**(४५) * १२७५ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर तालुक्यात (जि.नाशिक) युरियाचा प्रचंड तुटवडा निर्माण करुन व्यापाऱ्यांने टंचाईचा लाभ उठवत २८३ रूपयांची युरीयाची गोणी ४०० ते ४५० रुपये या महागडया दराने विकून शेतकऱ्यांची लुट करण्यात येत असलेल्या तक्रारी स्थानिक शेतकऱ्यांनी कृषी अधिकारी यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे हे खरे आहे काय,
(२)असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने कृषी विभागाने साठेबाजी तसेच महागडया दराने विकणा-या व्यापारांवर काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** १) हे खरे नाही, अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
२) प्रश्न उद्भवत नाही.
३) प्रश्न उद्भवत नाही.
४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हयात नदीघाटाची वाळू उपसा लिलावाची मुदत संपवूनही अवैध वाळू उपसा सुरु असल्याबाबत**

**(४६) * ७५८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात नदीघाटाची वाळू उपसा करणाऱ्या लिलावाची मुदत दिनांक 21 सप्टेंबर,2014 पर्यंतच होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ह्या लिलाव पध्दतीला पर्यावरण विभागाने ओक्षप घेतला असताना देखील महसूल विभागाने लिलावास परवानगी दिली हे खरे आहे काय,
(३) लिलावाची दिनांक २१ सप्टेंबर, २०१४ ची मुदत संपल्यानंतर या ठिकाणी अवैधरीत्या वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी विविध सामाजिक संघटनांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांना निवेदनाद्वारे दिल्या हे खरे आहे काय,
(४)असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने संबंधीताविरुद्ध कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सन २०१३-१४ या वर्षाचा वाळू लिलावाची मुदत दिनांक ३०/०९/२०१४ पर्यंत होती.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(४) व (५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, केलेल्या तपासणीत गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीच्या १० प्रकरणांमध्ये दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ५ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतक-यांना शासनाने अतितापमान, अतिपाऊस, रोगराई, दुष्काळ, यासारख्या वेगवेगळया आपत्तीपासून पिकांची नुकसान होत असल्याबाबत**

**(४७) * ४७० श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१)राज्यातील शेतक-यांना शासनाने अतितापमान, अतिपाऊस, रोगराई, दुष्काळ, यासारख्या वेगवेगळया आपत्तीपासून पिकांची नुकसान होत असल्याने हवामान आधारीत पिक विमा योजना सुरु केली हे खरे आहे काय,

(२) तसेच शेतक-यांना बँकेकडून कृषी पीक विमा योजना काढल्या जात असून सदर पीक विम्याचा लाभ अद्यापही शेतक-याचे नुकसान होवूनही मिळत नसल्याचे दिनांक ४ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले तसेच पीक विम्याच्या नावाखालील शेतक-यांचे कोटयवधी रुपयांचे प्रिमीयम भरले जात असूनही नुकसानभारपाई न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास सन २०१४-१५ च्या रब्बी हंगामात गहू, ज्वारी, हरभरा, या पिकांसाठी जाहीर केलेल्या विम्याचा हप्ता हा जास्त असून मिळणारा लाभ पुरेसा नाही अशा तक्रारी शासनाने कृषी विभागाकडे केल्या आहेत हे खरेआहे काय,
(४) असल्यास स्वयंचलित हवामान केंद्रांच्या अभावामुळे विमा कंपन्या विमा देण्यास टाळाटाळ करतात हे खरे आहे काय,
(५) असल्यास, पुणे जिल्ह्यात शेतक-यांनी पिक विमा योजनेकडे पाठ फिरवुन खरीप हंगाम सन 2014 - 15 मध्ये फक्त 18 हजार शेतक-यांनी पिक विमा काढला आहे हे खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाने तातडीने स्वंयचलित हवामान केंद्र उभारण्याबाबत व विमा रक्कमेत वाढ करणेबाबत शासन स्तरावरुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) असल्यास, शासन या प्रकरणाची चौकशी करुन विमा कंपनीवर तात्काळ कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** १) होय.
२) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअतंर्गत खरीप हंगाम २०१३-१४ मध्ये १४.८४ लाख शेतक-यांनी रु.७९.११ कोटी विमा हप्ता भरुन १३.३१ लाख हेक्टर`क्षत्र संरक्षित केले. त्यापैकी २.८६ लाख शेतक-यांना रु.८८.४१ कोटी नुसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली. त्याचप्रमाण रब्बी हंगाम २०१३-१४ मध्ये २.५७ लाख शेतक-यांनी रु.३७.६० कोटी विमा हप्ता भरुन २.४० लाख हेक्टर`क्षत्र संरक्षित केले. त्यापैकी अदांजे ०.६७ लाख शेतकरी नुकसान भरपाई पात्र ठरले असून, रुपये १४.७० कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली आहे.
हवामान आधारित पीक विमा योजनेमध्ये रब्बी हंगाम २०१३-१४ मध्ये १३९९८ शेतक-यांनी रु. २.८८ कोटी विमा हप्ता भरुन १५८३० हे`क्षत्र विमा संरक्षित केले, त्यापैकी ८३२४ शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून या शेतक-यांना रु. ३.९१ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे. तसेच खरीप हंगाम २०१४ मध्ये १२.७३ लाख शेतक-यांनी १८९.६४ कोटी विमा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला आहे. नुकसान भरपाई निश्चित करण्याचे काम संबंधीत विमा कंपन्यांमार्फत करण्यात येत आहे.
३) नाही.
४) हवामान आधारित पीक विमा योजनेत संदर्भ हवामान केंद्रांची स्थापना त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येते आणि संदर्भ हवामान केंद्रात नोंद झालेल्या आकडेवारीवरुन नुकसान भरपाई निश्चित केली जाते.
५) खरीप हंगाम २०१४-१५ मध्ये पुणे जिल्ह्यातील १८ हजार शेतक-यांनी रु. ४१.१८ लाख विमा हप्ता भरुन १२००० हेक्टर`क्षत्र विमा संरक्षीत केले आहे.
६) राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून सार्वजनिक खाजगी भागीदारीतून महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
७) प्रश्न उद् भवत नाही.
८) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.